**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ३६६० / २०२३ / कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सचिन नारायण कोळी | निवासी नायब तहसिलदार, तहसिल कायार्लय,चंदगड ता .चंदगड जिकोल्हापूर . | तहसिलदार, चंदगड ताकोल्हापूर ..चंदगड जि . |

**( सुनावणी दिनांक - १८ /०२ /२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. १०.०६.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती वेळेत दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि. १३.०३.२०२३ च्या माहिती अर्जात दिनांक २७/०४/२०२२ रोजी गावकामगार तलाठी कागणी येथे अर्ज दिलेल्या अर्ज नोंद वहीची आवक जावक, बारनिशी नोंद इ.माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि.१८/०४/२०२३ च्या पत्राने उत्तर दिले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे.सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थीच्या विनंतीवरुन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३६६० / २०२३ / कोल्हापूर /1326/2025 दिनांक - 6/3/2025